महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनासाठी अधिग्रहित वाहने तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक नाहिअ-३४२६/प्र.क्र.१०२/समन्वय-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०६ नोव्हेंबर, २०२६.

वाचा:- विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र.रोहयो/हि.अ.-२६/कावि-०४/२०२६, दिनांक २१.१०.२०२६.

<u>प रि प त्र क</u>

नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, मा.राज्यमंत्री तसेच शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या परिवहन व्यवस्थेकरिता अंदाजे ११०० ते १२०० सुस्थितीतील वाहनांची आवश्यकता असते. सदर वाहनांची उपलब्धता करण्यासाठी नजीकच्या महसूल विभागातील शासकीय कार्यालये, मंडळे इत्यादींकडून वाहने अधिग्रहित करण्यात येतात. तथापि, मागील अधिवेशनाच्या अनुभवावरून असे निर्देशनास आले आहे की, काही कार्यालय प्रमुखांकडून अधिग्रहित वाहने उशिराने उपलब्ध करून दिली जातात. तसेच काही कार्यालयांकडून वाहने कार्यमुक्त करण्यास टाळाटाळ केली जाते. परिणामी नाइलाजाने खाजगी पुरवठादारांकडून खाजगी वाहने उपलब्ध करून घ्यावी लागतात.

२. सर्व संबंधित विभागांतील कार्यालय प्रमुखांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी त्यांच्या आधिपत्याखालील शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे तसेच शासन अंगीकृत कंपन्यांकडील अधिग्रहित करण्यात येणारी सर्व सुस्थितीतील वाहने आवश्यक असलेला प्रवास कालावधी विचारात घेऊन निर्देशित दिनांकास नागपूर येथे प्रत्यक्ष पोहचतील अशा प्रकारे पुरेशा कालावधीपूर्वी कार्यमुक्त करण्यात यावीत. तसेच अधिग्रहित वाहने निर्धारित दिनांकास नागपूर येथे उपलब्ध होतील याची काटेकोरपणे दक्षता घेण्याबाबत सर्व विभाग प्रमुख /संबंधित कार्यालयांना निर्देश देण्यात येत आहेत.

३. सर्व संबंधित विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त निर्देश त्यांच्या अधीनस्थ कार्यालयांच्या निदर्शनास आणावेत.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६११०६१७०२०६५५०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK RAMCHANDRA REDEKAR

Digitally signed by ASHOK RAMCHANDRA REDEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=192642FDE64FF77D80E06A6AE786AE3C617EB03088B459DD9FF4138FCA1B9AD8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6DFDC37B68ED4F01390B0E387CBD563129A3ABEF7908E369425018B546EF526F, cn=ASHOK RAMCHANDRA REDEKAR
Date: 2026.11.06 17:03:07 +05'30'

(अ.रा.रेडेकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत:-
१. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.

३. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
४. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग, छत्रपती संभाजी नगर.
५. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मूल्यांकन व राष्ट्रीयीकरण),महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. मुख्य वनसंरक्षक, नागपूर मंडळ, नागपूर.
८. जिल्हाधिकारी, नागपूर, वर्धा, चंद्रपूर,भंडारा, गोंदिया, गडचिरोली.
९. जिल्हाधिकारी, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा.
१०. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजी नगर, जालना, बीड, धाराशिव, नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली.
११. जिल्हाधिकारी, नाशिक, जळगांव, अहिल्यानगर, धुळे, नंदुरबार.
१२.निवडनस्ती (समन्वय-१).

****